REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# आदिवासी समाजाच्या समस्या व उपाययोजना (सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य व शिक्षण)

**दत्तात्रय शिवाजी थोरात**
सहा. प्राध्यापक (राज्यशास्त्र)
सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय, नातेपुते
ता. माळशिरस, जि. सोलापूर (महाराष्ट्र–भारत)

## ● प्रास्ताविक :

आदिवासी समाज हा भारतीय समाजातील दुर्बल घटकांपैकी एक होय. आदिवासी समाजाला मुळचे रहिवाशी, जंगलाचे राजे, भूमिपूत्र अशा नावांनी ओळखले जाते. आदिवासी जमातींचा उल्लेख भारतीय राज्यघटनेत 'अनुसूचित जमाती' असा करण्यात आला आहे. आदिवासी समाज म्हणजे प्रगत समाजापासून अलिप्त असलेला दूर रानावनात व डोंगरदऱ्यात वास्तव्य करणारा आणि धर्म, बोलीभाषा इत्यातील बाबतीत समानता असलेला असा साधा सामाजिक समूह होय. दुर्गम भूभागात वास्तव्य, लहान आकार, समान रक्तसंबंधावर आधारित समुह, स्वतःची बोलीभाषा, समान धर्म, प्राथमिक संबंधाचे प्राबल्य अशी काही आदिवासी समाजाची वैशिष्टे सांगता येतील. महाराष्ट्रात सह्याद्री पट्टा, सातपुडा पट्टा, गोंडवन विभाग या भागात आदिवासींचे वास्तव्य असलेले दिसते.

## ● आदिवासी समाजाच्या समस्या :

आदिवासी जमातींचा समावेश दुर्बल समाजघटकात केला जातो. बहुतेक सर्वच आदिवासी जमाती आर्थिक, सामाजिक, राजकीय व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या अवस्थेत जीवन जगत आल्या आहेत. त्यांचा आता प्रगत समाजाशी संबंध येऊ लागला आहे. परंतु प्रगत समाजाशी वाढत्या संपर्काचा आदिवासींना लाभ होण्याऐवजी त्यांचे नुकसानच जास्त झाले आहे, असे म्हणावे लागते. आदिवासी समाजात भेडसावत असलेल्या काही महत्वाच्या समस्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

## ● सामाजिक व सांस्कृतिक समस्या :

### 1. अनिष्ट प्रथांचा शिरकाव :–

आदिवासी समाजाचा प्रगत समाजाशी संबंध येऊ लागल्याने प्रगत समाजातील अनेक अनिष्ट प्रथांचा शिरकाव त्यांच्या जीवनात झाला. (उदा. बालविवाह, हुंडापध्दत) आदिवासी समाजात बालविवाहाची प्रथा नव्हती. पूर्वी त्यांच्यात वस्तूंच्या स्वरूपात वधूमूल्य घेण्याची प्रथा होती. परंतु प्रगत समाजाशी संपर्क आल्यानंतर त्यांचा परिणाम हुंडा घेण्यामध्ये झाला आणि स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोनही बदलत गेला व त्यांच्या प्रामाणिक जीवनपध्दतीला तडा गेला.

### 2. स्त्रियांचे शोषण :–

प्रगत समाजीतील जमिनदार, व्यापारी, सावकार अशा अनेक घटकांनी स्त्रियांचे शोषण केले. त्याच्या दृष्टीने आदिवासींच्या स्त्रिया उपभोगाच्या वस्तु ठरल्या. आदिवासींचे दारिद्र्य, भोळेपण या गोष्टी म्हणजे त्यांना संधी वाटली आणि त्यांना आपल्या वासनेचे शिकार बनविले.



### 3. मूल्यव्यवस्थेत बदल :—

आदिवासींची जीवनपध्दती अतिशय साधी होती. पण त्यांचा जेव्हा प्रगत समाजाशी संपर्क आला, तेव्हा त्यांनी नव्या मूल्यांचा स्वीकार केला. पण हा बदल बऱ्याच लोकांना मानवला नाही.

### 4. धर्मप्रसारातून निर्माण झालेल्या समस्या :—

ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी आदिवासींविषयी सहानुभूतीपूर्वक दृष्टीकोन ठेवला होता. त्यांच्या धर्मप्रसारामुळे आदिवासी समाजाची एकत्मता भंग पावली. ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केलेले लोक आपल्या मूळच्या प्राथमिक स्वरूपाच्या धार्मिक कल्पनांशी नाते कायम ठेवलेले लोक आणि हिंदू धर्माकडे कल असलेले लोक असे वेगवेगळे गट त्यांच्यात निर्माण झाले.

## ● आरोग्य व शिक्षणासंबंधीच्या समस्या :

### 1. व्यसनाधिनता :—

व्यसनाधिनतेला दारिद्र्यही कारणीभूत झालेले आहे. कित्येकदा अर्धपोटी राहण्याचे प्रसंग त्यांच्यावर येतात. त्यातून निर्माण होणाऱ्या दुःखाचा थोडाफार विसर पडावा म्हणून ते व्यसनाकडे वळतात आणि या व्यसनामुळे ते अधिक दरिद्री होतात.

### 2. कुपोषण :—

आदिवासी स्त्रिया व मुले मोठ्या संख्येने कुपोषणाचे बळी पडतात. शरीराच्या वाढीसाठी आवश्यक असलेली जीवनसत्वे, उष्मांक आणि इतर पोषण घटक त्यांना त्यांच्या नेहमीच्या आहारातून मिळू शकत नाहीत, त्यातून कुपोषणाची समस्या निर्माण होते.

### 3. आरोग्यविषयक सुविधांचा अभाव :—

आदिवासी लोकांना चांगल्या प्रकारच्या आरोग्यविषयक सुविधा कधीच उपलब्ध होत नाहीत. आदिवासी भागात जाऊन काम करण्यास उच्चशिक्षित डॉक्टर तयार नसतात. पुरेसे कर्मचारी नसतात, औषधांचा तुटवडा असतो. त्यामुळे अनेक आदिवासी रोगग्रस्त होतात. बरेचजण व्यक्तिगत स्वच्छतेकडे लक्ष देत नाहीत. यामुळे अनेक त्वचेचे रोग, साथीचे रोग मोठ्या प्रमाणात दिसून येतात.

### 4. शिक्षणाचा अभाव :—

आदिवासी समाजाचे एक वैशिष्ट्य म्हणून त्यांच्या निरक्षरतेचा उल्लेख केला जातो. पूर्वी आदिवासी समाजात शिक्षणाचा प्रसार झाला नव्हता. पुढे सरकारने आदिवासींना शिक्षण देण्यासाठी जाणीवपूर्वक काही पाऊने उचलली. त्यामुळे त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार झाला. पण संपुर्ण देशातील साक्षतेचे प्रमाण विचारात घेता, आदिवासी आजही शिक्षणापासून खूप दूर आहेत, असेच म्हणावे लागेल.

## ● संविधानात्मक उपाययोजना :

### 1. मुलभूत हक्क :—

या हक्कांमध्ये, समानतेचा हक्क, धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, संविधानात्मक उपाययोजनेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क आणि शोषणविरूध्दचा हक्क यांचा समावेश होतो. या हक्कांमुळे आदिवासींना सर्व बाबतीत समान संधी मिळाली, त्यांच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याची हमी भारतीय राज्यघटनेने दिली.

### 2. राखीव जागा :—

आदिवासींना संसदेत व घटक राज्य विधिमंडळात राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत. त्या आदिवासींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निश्चित केल्या जातात. ही तरतूद प्रथम दहा वर्षासाठी करण्यात आली होती. परंतु त्यानंतर प्रत्येक दहा वर्षानी ती वाढविण्यात आली. आदिवासी व्यक्तींसाठी शासकीय नोकऱ्यांमध्ये आणि शैक्षणिक प्रवेशामध्ये राखीव जागा ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे.

**3. अनुसूचित जमातीसाठी राष्ट्रीय आयोग :—**

केंद्र सरकारने अनुसूचित जातीसाठी एक आणि अनुसूचित जमातींसाठी एक अशा दोन स्वतंत्र्य राष्ट्रीय आयोगांच्या स्थापनेची तरतूद करण्यात आलेली आहे. या आयोगाचे महत्वाचे कार्य म्हणजे केंद्र शासनाने काढलेल्या आदेशाची चौकशी करणे व त्यावर लक्ष ठेवणे. सरकारने हाती घेतलेल्या विकास कार्याच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे. आपल्याला योग्य वाटेल तेव्हा केल्या जात असलेल्या कार्याचा अहवाल पाठविणे, विकास कामांचे अहवाल सादर करणे.

**4. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प :—**

ज्या गटात किंवा गटसमुहात अनुसूचित जमातींची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या 50 टक्केपेक्षा अधिक आहे, त्या गटांचा अंतर्भाव एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पात समावेश होतो. आदिवासी समाजाचे जे लोक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या बाहेर आहेत. त्यांना आदिवासी क्षेत्र उपाययोजनेचे फायदे उपलब्ध करून देण्यासाठी माडा (Modifide Area Development Approach (MADA)) आणि मिनी माडा (MINI MADA) क्षेत्र तयार करण्यात आली आहेत.

**5. आदिवासी महिला सशक्तीकरण :—**

केंद्र सरकारने सन 2002—03 मध्ये ही योजना सुरू केली. या योजनेत दारिद्र्यरेषेखालील असलेल्या आदिवासी महिलांना किरकोळ स्वरूपाच्या कामासाठी 50 हजार रूपयांपर्यंत 4 टक्के व्याजाने कर्ज उपलब्ध करून दिले जाते. याचा आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी फायदा होतो.

**6. आदिवासींसाठी आश्रमशाळा :—**

केंद्र सरकारने सन 1990—91 मध्ये ही योजना सुरू केली. विद्यार्थ्यांचे राहणे, जेवणे व शिक्षण अशा सर्व सोयी या योजनेअंतर्गत सरकारच्या खर्चातून होतात.

**7. आदिवासी युवकांसाठी व्यावसायिक शिक्षण :—**

ही योजना केंद्र सरकारने 1992—93 पासन सुरू केली. आदिवासी युवकांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी त्यांच्या कौशल्याचा विकास करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

**8. राजीव गांधी राष्ट्रीय फेलोशिप :—**

जनजाती कार्य मंत्रालयाने सन 2005—06 पासून राजीव गांधी फेलोशिप ही योजना सुरू केली. एम.फिल., पीएच.डी. अशाप्रकारचे उच्च शिक्षण घेण्यासाठी या योजनेअंतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांना अर्थसहाय देण्यात येते.

**● महाराष्ट्र सरकारच्या आदिवासी कल्याण योजना :**

**1. शिक्षणप्रसार :—**

आदिवासी समाजात शिक्षण प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने विशेष प्रयत्न चालविले आहेत, जिल्हा परिषदांमार्फत आदिवासी भागात बालवाड्या चालविल्या जातात. काही ठिकाणी या बालवाड्यांना जोडून पाळणाघरेही चालविली जातात. आश्रमशाळा स्थापन करणे हा ही राज्य शासनाचा एक प्रमुख कार्यक्रम आहे.

**2. आरोग्य सेवा :—**

महाराष्ट्र राज्यात सन 1976 पासून आदिवासी योजनेअंतर्गत येणाऱ्या जिल्हयात आदिवासींसाठी विशेष आरोग्य सेवा राबविली जात आहे. त्यासाठी पाण्याचे नियमित शुध्दीकरण, कॉलरा प्रतिबंधक लस टोचणे, लोकांना आरोग्य व स्वच्छता यासंबंधी माहिती देणे, प्राथमिक अवस्थेतील कुष्ठरोगी शोधून काढून त्यांच्यावर औषधोपचार करणे, यासारख्या बाबींवर भर देण्यात येत आहे.

### 3. आदिवासी क्षेत्रातील एकाधिकार खरेदी योजना :–

ही योजना 'महाराष्ट्र आदिवासी आर्थिक सुधारणा कायदा 1976' अन्वये आदिवासी क्षेत्रात सुरू करण्यात आली आहे. आदिवासींची आर्थिक स्थिती सुधारणे, त्यांचा विकास घडवून आणणे, आदिवासींनी निर्माण केलेल्या मालाला रास्त भाव मिळवून देणे आणि सावकार, व्यापारी, दलाल यांच्याकडून होणारे आदिवासींचे आर्थिक शोषण थांबविणे ही या योजनेची उद्दिष्टे आहेत.

### 4. खावटी कर्ज योजना :–

आदिवासी लोक सावकारांच्या अमानुष शोषणाचे बळी ठरतात म्हणून 1978 पासून राज्यात 'खावटी कर्ज योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेनुसार शासनाने महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळास अभिकर्ता म्हणून 3 कोटी रूपयांचा फिरता निधी उपलब्ध करून दिला आहे. आदिवासींच्या अडचणींच्या काळात त्यांना 'खावटी कर्ज' उपलब्ध करून दिले जाते. या कर्जाचा सत्तर टक्के भाग अन्नधान्याच्या स्वरूपात तर तीस टक्के भाग रोख रक्कमेच्या स्वरूपात दिला जातो.

### 5. न्युक्लिअर बजेट योजना :–

ही योजना 1981–82 या वर्षापासून आदिवासी उपाययोजना क्षेत्रात राबविली जात असून 1986–87 या वर्षापासून तिचे क्षेत्र विस्तारित करण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत आदिवासींना छोट्या उद्योगधंद्यांसाठी अर्थसहाय देणे, शिवणयंत्रांसाठी अर्थसहाय देणे, सैन्यभरतीसाठी प्रोत्साहित व मार्गदर्शन करणे, स्पर्धा परिक्षांसाठी मार्गदर्शन करणे, त्यांना टंकलेखन, लघुलेखन यांचे प्रशिक्षण देणे. व्यावसायिक प्रशिक्षण देणे यासारख्या योजना राबविल्या जातात.

### 6. नवसंजीवन योजना :–

आदिवासींना आरोग्य सेवा पुरविणे, त्यांना पुरेसा रोजगा उपलब्ध करून देणे यासारख्या बाबींची परिणामकारक अंमलबजावणी नवसंजीवन योजनेद्वारे केली जाते.

### 7. स्वयंसेवी संघटनांचे योगदान :–

बाबा आमटे यांनी स्थापन केलेल्या 'महारोगी सेवा समिती' च्या वतीने 'लोकबिरादरी हेमलकसा येथे आदिवासींच्या विकासाचा प्रकल्प राबविला जात असून त्यामार्फत आदिवासी कल्याणाच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. अनुताई वाघ यांनी कोसबाड येथे ग्राम बालशिक्षण केंद्राची स्थापना करून शिक्षणाचा प्रसार केला. मेधा पाटकर यांनी 'नर्मदा बचाव आंदोलन' सुरू करून विस्थापितांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न चालविले आहेत. श्रमजिवी संघटना, आदिवासी सेवा संघ अशा अनेक स्वयंसेवी संघटनांनी महत्वपूर्ण योगदान दिले आहे.

### ● समारोप / निष्कर्ष :

आदिवासी समाज हा आदिम समाज म्हणून ओळखला जातो. वनपूजक असलेला आदिवासी समाज स्वतःची अशी एक न्यायव्यवस्था निर्माण करतात. आधुनिकीकरणाचे सर्व क्षेत्रातील परिणाम आज आदिवासी समाजावरही मोठ्या प्रमाणात झाले आहेत. मानवी अधिकारांची जाणीव जागृती होत असतानाच नव्याने अनेक सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समस्यांची निर्मिती झालेली आहे. प्रगत समाजव्यवस्थेच्या समस्यांचा शिरकाव आदिवासी समाजामध्येही झाला.

संपुर्ण जगभर असा समाज आढळतो. भारतातही मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज आहे. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या खेरीज समग्र समताधिष्ठित समाजाची निर्मिती होणे केवळ अशक्य आहे. ही बाब समाजधुरिणांनी आणि राजकीय नेतृत्वाने लक्षात घेणे आवष्यक आहे.

● **संदर्भ :**

**मराठी / हिंदी**

1. आहुजा राम, सामाजिक समस्याऐं, रावत पब्लिकेशन्स, 2000, (द्वितीय संस्करण), 2009, जयपूर.
2. पाटील व्ही. बी., मानवी हक्क, के' सागर पब्लिकेशन्स, 2012 (सातवी आवृत्ती), पुणे.

**इंग्रजी :–**

1. Basu A. R., Tribal Development Programs and Administration in India, National Book Organization, 1985, New Delhi.
2. Chattopadhyaya K. D., Tribalism in India, Vikas Publishing House, 1978, New Delhi.
3. Kaur Gurkirat, Fundamental Rights, Shree Publishers & Distributors, 2006, New Delhi.
4. Ramajah P., Issues in Tribal Development, D. K. Publishers, and Distributors, 1988, New Delhi.
5. Ramanna Rao, Tribal Development : New Approches, Discovery Publishing House, 1992, New Delhi.
6. Suchinmayee Rachana, Gender, Human Rights & Environment, Atlantic Publishers, 2008, New Delhi.
7. Thakkar A. I., Socio-Economic Development of Tribes in India, 1986, New Delhi.